10-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 09-03-2025 23:25 Page 1



## निवडक

### बेटी बचाओ बेटी पढाओ घोषणेतून क्रांतीत बदल : फळदेसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजना ही केवळ एक घोषणा होती, पण आता ती देशात महिलात्वाचा उत्सव साजरा करणारी क्रांती बनली आहे, असे मत समाज कल्याण मंत्री श्री. सुभाष फळदेसाई यांनी व्यक्त केले.
आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दक्षिण गोवा जिल्हा प्रशासनाने 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेची १० वर्षे साजरी करण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. फळदेसाई म्हणाले की, समाजाने महिलांसाठी असे अनुकूल वातावरण निर्माण करावे जिथे त्यांना यश आणि प्रगतीची प्रत्येक संधी घेता येईल. महिलांनी जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी नेहमीच तयार असले पाहिजे कारण यामुळे त्यांना जीवनात उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या चांगल्या संधी मिळतील असे ते म्हणाले. लिंग असमानतेच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी लशींळ बचाव, बेटी पडाव सुरू करण्यात आली आहे. श्री. फळदेसाई म्हणाले की मुलींच्या जन्माचे प्रमाण आता ९३३ वरून ९७७ पर्यंत वाढले आहे आणि योजनेचे लक्ष्य नजीकच्या भविष्यात साध्य केले जाईल.
मंत्र्यांनी उपस्थित असलेल्या सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.
यावेळी दाबोली येथील तांत्रिक प्रशिक्षण केंद्राच्या कमांडिंग ऑफिसर कर्नल सुमन कुमारी यांचा सत्कार करण्यात आला. कर्नल कुमारी यांनी आपल्या भाषणात तरुणींना आयुष्यात मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. भारतीय सैन्याने शिस्त, लवचिकता आणि समर्पणाने त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध केले असे त्या म्हणाल्या. दक्षिण गोवा पोलिस अधीक्षक टिकम सिंग वर्मा आयएएस म्हणाले की लैंगिक समानता ही समाजाची गरज बनली आहे आणि महिला सक्षमीकरण आणि कल्याण आता राष्ट्रीय महत्त्वाचा विषय बनला आहे. त्याचप्रमाणे महिलांना शिक्षण देणे ही समाजाच्या प्रगती आणि विकासासाठी एक मार्ग बनली आहे. त्यांनी आश्वासन दिले की दक्षिण गोवा पोलिस महिलांना प्रत्येक शक्य मार्गाने सुरक्षा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहेत.दक्षिण गोव्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती एग्ना क्लीटस, आयएएस यांनी आपल्या स्वागतपर भाषणात बेटी बचाव बेटी पडाव योजनेच्या विविध उद्दिष्टांची माहिती दिली.
महिला आणि बाल विकास संचालक श्री. मॅन्युएल बारेटो यांनी गोव्यात बेटी बचाव बेटी पडाव योजनेअंतर्गत सरकार राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच बचत गटातील विविध महिला, महिला व्यावसायिक, क्रीडा क्षेत्रातील महिला, स्वयंसेवी संस्थांमध्ये काम करणाऱ्या महिला, अंगणवाडी शिक्षिका यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती राधिका प्रभुदेसाई यांनी केले तर उपजिल्हाधिकारी श्री. वेल्टन टेलेस यांनी आभार मानले.

### मांद्रे भंडारी समाजातर्फे २३ रोजी करीयर विषयक मार्गदर्शन शिबिर




**मांद्रे : माहिती देताना अध्यक्ष शिवकुमार आरोलकर. सोबत दत्ताराम नाईक, अनिल म्हामल, रंजन म्हामल व प्रशांत हरमलकर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** पेडणे तालुका गोमंतक भंडारी समाजतर्फे 'युवकांना नागरी सेवेतील संधी' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम रविवार दि. २३ रोजी दुपारी २.४५ वाजता दीनदयाळ सभागृह, मांद्रे येथे आयोजित केल्याची माहिती भंडारी समाज अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी दिली.यावेळी सरचिटणीस दत्ताराम नाईक,मुख्य संयोजक रंजन म्हामल,अनिल म्हामल व प्रशांत हरमलकर उपस्थित होते.
या कार्यशाळेत पुणे, चाणक्य आयएएस अकादमीचे मार्गदर्शक प्रा डॉ अमित मेढेकर उपस्थित राहणार आहेत.तसेच सोहळ्यास सरपंच राजेश मांद्रेकर प्रमुख पाहुणे नात्याने उपस्थित असतील.ह्या कार्यशाळेत नागरीसेवेतील संधी,परीक्षा संधी व वाटा,परीक्षेसाठी करावयाची तयारी ह्यात यूपीएस सी,राज्य नागरी सेवा तसेच विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात येईल.ह्या कार्यशाळेत दहावी,बारावी किंवा पदवी, पदव्युत्तर, उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी किंवा ज्यांना नागरी सेवेत जाण्याची इच्छा आहे,त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.इश्चुक विद्यार्थ्यानी २० मार्च पर्यंत अध्यक्ष शिवकुमार आरोलकर,रंजन म्हामल किंवा दत्ताराम नाईक यांच्याशी नावनोंदणी करावी.ह्या सेमिनारसाठी प्रवेश शुल्क नाही.विद्यार्थ्यानी २.४५ पर्यंत सभागृहात उपस्थित राहवे असे आवाहन अध्यक्ष शिवकुमार आरोलकर यांनी केले आहे.

### हरमल भागात धुक्यामुळे बागायतीवर परिणाम

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** येथील भागात सद्या वाढत्या धुक्यामुळे काजू, आंबा व अन्य प्रकारच्या बागायातीवर दुष्परिणाम होण्याची शक्यता असून,हा हंगाम नुकसानीचा तर जाणार नाही,ना अशी चिंता शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे.
या भागात काल रविवारी पहाटे दाट धुके पडले होते.आठवड्यानंतर पुन्हा धुके पडले होते.ह्या धुक्याच्या फटका काजू व आंबा बगायतीवर विपरीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.काजू, आंबा मोहोर करपण्याची,गळून पडण्याची शक्यता असते व त्यामुळे फळ लागवडीचा मोसम काळ चुकणार व ह्या नंतर येणारा मोहोर फायदेमंद होऊ शकतो, असे मत शेतकरी मनोहर नाईक यानी व्यक्त केले.गेल्या आठ दिवसात उकाडा असह्य होत असल्याचे सांगितले.हवामान खात्याच्या माहितीनुसार उकाडा हिट व्हेव वाढत असून तीन दिवसांचा काळ, आठ, दहा दिवस झाल्याचे नागरिक दीपक पेडणेकर यानी व्यक्त केले. हिट व्हेव वाढत राहिल्यास शरीर तापमान सांभाळणे कठीण होईल असे मत पेडणेकर यानी व्यक्त केले.दरम्यान, असह्य उकाडा विदेशी पर्यटकाना सहन होत नसल्याचे समजते, पर्यटक परतीच्या वाटेला असतात,त्यामुळे पर्यटन हंगाम लवकर आटोपण्याची भीती व्यावसायिक अभिजित नाईक यांनी व्यक्त केली.पर्यटन व्यवसाय लवकर अटोप न्याची शक्यता असल्याचे पेडणेकर यानी सांगितले.

# बेशिस्त पर्यटकांच्या त्रासाने फोंतेनहास वासीय हैराण

## शाब्दिक आणि शारीरिक वादही वाढले असल्याची माहिती आली समोर

■ टीम दैनिक हेराल्ड




**पणजी, दि. ९ :** ऐतिहासिक आणि नयनरम्य लॅटिन क्वार्टर फोंतेनहास हे पोर्तुगीज शैलीतील वैशिष्ट्यपूर्ण वास्तुकलेमुळे पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनले आहे. मात्र, वाढत्या गर्दीमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. अनेकांनी पर्यटकांच्या बेशिस्त वर्तनामुळे होणाऱ्या समस्यांबाबत तक्रारी केल्या असून, शाब्दिक आणि शारीरिक वादही वाढले असल्याची माहिती समोर आली आहे.

स्थानिक रहिवाशांनी स्पष्ट केले की त्यांना पर्यटकांविरोधात कोणताही व्यक्तिगत आक्षेप नाही. मात्र, काही पर्यटक विना परवानगी घरांच्या भिंतींना स्पर्श करतात, पाय ठेवतात, तसेच सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेचा अनादर करतात. याशिवाय, फोटोग्राफी करू नये असे फलक लावले असतानाही, अनेक पर्यटक त्याकडे दुर्लक्ष करून फोटोसेशन करतात, ज्यामुळे स्थानिकांच्या गोपनीयतेचा भंग होतो.

स्थानिक रहिवासी अनिल कुमार रिवणकर यांनी सांगितले की, पर्यटक आमच्या घरांच्या भिंती घाण करतात, कचरा टाकतात आणि कधी कधी अतिरेकी गोंधळ घालतात. काही वेळा विद्यार्थीदेखील मोठ्या आवाजात बोलतात, ओरडतात. आवाजाचा त्रास असह्य झाल्यास आम्ही त्यांना समजावण्याचा प्रयत्न करतो, परंतु काही वेळा पोलिसांना बोलवण्याची वेळ येते. विशेष म्हणजे, परदेशी पर्यटक शिस्तबद्ध असतात आणि त्यांच्या वागणुकीबाबत अधिक जबाबदारीने वागतात. मात्र, काही देशांतर्गत पर्यटकांना सार्वजनिक ठिकाणी वावरण्याच्या शिष्टाचारांची जाणीव नसते.

क्लिफ्टन अफोन्सो या आणखी एका स्थानिक रहिवाशाने सांगितले की, आम्ही पर्यटकांना स्पष्ट सूचना देणारे फलक लावले आहेत. आम्ही फोटो काढण्यास मनाई करत नाही, पण त्यासाठी योग्य वर्तन आवश्यक आहे. काही पर्यटक रस्त्याच्या मधोमध उभे राहतात, आरडाओरड करतात, घरात शिरण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आमच्या गोपनीयतेचा भंग होतो

त्यांनी यावर उपाय म्हणून अधिकाऱ्यांनी नियमित गस्त घालावी, तसेच मार्गदर्शकांनी पर्यटकांना नियमांचे पालन करण्यास प्रवृत्त करावे, अशी मागणी केली. सध्या पर्यटक गट विनाव्यवस्था वागताना दिसतात. त्यामुळे हा परिसर कळंगुट किंवा बागासारखा गोंगाटी आणि अस्वच्छ होण्याची भीती आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, अधिकाऱ्यांनी पर्यटन व्यवस्थापनासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. पोलिसांनी गर्दीच्या वेळी अधिक गस्त घालावी, तसेच पर्यटन विभागाने पर्यटकांसाठी मार्गदर्शक सूचना आणि वर्तनाचे नियम स्पष्टपणे मांडावेत. यामुळे पर्यटक आणि स्थानिक रहिवाशांमधील तणाव कमी होऊन शिस्तबद्ध पर्यटनाला चालना मिळू शकते.

### उपाययोजना कागदावरच

**शहरातील ऐतिहासिक साओ टोम आणि फोंतेनहास परिसरात अनियंत्रित पर्यटकांमुळे रहिवाशांच्या गोपनीयतेला धोका निर्माण होत असल्याच्या तक्रारींवरून पणजी पोलिसांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये या परिसरात पर्यटकांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक रोबोट वाहन आणि दोन पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आल्याचे सांगितले होते . सध्या ते कुठे आहेत आणि काय करतायत हे कुणालाच माहीत नाही. स्थानिक नागरिकांना त्रास देणाऱ्या आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम करणाऱ्या बेशिस्त पर्यटकांवर नियंत्रण आणण्यासाठी हा उपाय योजण्यात आल्याचे सांगण्यात आले होते.**

# सीरियातील हिंसाचार वाढला ; १ हजार जणांचा मृत्यू झाल्याची

**दमास्कस, दि. ९ :**

सीरियामध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या हिंसाचारात मोठ्या प्रमाणात नागरिकांचे बळी गेल्याने स्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष अहमद अल-शारा यांनी नागरिकांना शांतता आणि एकतेचे आवाहन केले आहे.

ब्रिटनस्थित सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राइट्स संस्थेच्या माहितीनुसार, गेल्या शुक्रवार आणि शनिवारी झालेल्या हिंसक चकमकींमध्ये अलावाइट अल्पसंख्याक समुदायाला लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्यांमध्ये तब्बल ७४५ नागरिकांचा मृत्यू झाल्याचा अहवाल आहे.

सीरियन वेधशाळेच्या अहवालानुसार, गेल्या चार दिवसांत झालेल्या संघर्षांमध्ये मृतांची एकूण संख्या १ हजारांहून हून अधिक झाली आहे. या मृतांमध्ये नवीन इस्लामिक सरकारशी संबंधित १२५ सैनिक आणि माजी राष्ट्राध्यक्ष बशर अल-असद समर्थक १४८ सैनिकांचा समावेश आहे. देशातील वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष अहमद अल-शारायांनी जनता आणि सुरक्षा दलांना संयम राखण्याचे आवाहन केले आहे. देशातील अस्थिरता लक्षात घेऊन सीरियन अंतरिम सरकारने लटाकिया आणि टार्टस या किनारी भागांमध्ये मोठ्या संख्येने सैन्य तैनात केले आहे. माजी राष्ट्राध्यक्ष असद समर्थकांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथकेही तैनात करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सीरियातील हिंसाचाराबाबत आंतरराष्ट्रीय समुदायाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गल्फ कोऑपरेशन कौन्सिल चे सरचिटणीस जसम अल-बुदाईवी यांनी सीरियन सरकारला पाठिंबा दर्शवला आहे. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाने बेकायदेशीर गटांनी सुरू केलेल्या हिंसाचाराचा निषेध केला आहे. संयुक्त अरब अमिरातीने सीरियन सुरक्षादलांवरील हल्ल्याचा निषेध केला आहे आणि सीरियाच्या सार्वभौमत्वाच्या समर्थनाचा पुनरुच्चार केला आहे. सौदी अरेबिया, कुवेत, बहरीन आणि इजिप्त यांनीही सीरियातील बेकायदेशीर गटांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. जॉर्डनचे परराष्ट्र मंत्री अयमान अल-सफादी यांनी सीरियाच्या स्थिरतेसाठी सर्व शक्य त्या उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

लटाकिया आणि टार्टस येथे सुरू असलेल्या संघर्षात मोठ्या प्रमाणावर हानी होत असल्याने संपूर्ण देशात भीतीचे वातावरण आहे. अलावाइट समुदायावर झालेल्या हल्ल्यांमुळे धार्मिक संघर्ष उफाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सीरियातील परिस्थिती अधिक बिघडू नये यासाठी सरकार आणि आंतरराष्ट्रीय समुदायाकडून शांतता स्थापनेसाठी प्रयत्न सुरू आहेत. देश पुन्हा एका मोठ्या गृहयुद्धाच्या उंबरठ्यावर तर नाही ना? हा प्रश्न आता जागतिक स्तरावर उपस्थित केला जात आहे.

# बंधारा फुटल्याने तिवरे-ओरगावमधील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ९ :** तिवरे-ओरगाव पंचायतीच्या हद्दीतील शेतकऱ्यांना बंधारा फुटल्याचा मोठा फटका बसला आहे. या दुर्घटनेमुळे ५० एकरहून अधिक भातशेती खाऱ्या पाण्याखाली गेली असून, शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने भातासह विविध भाजीपाला पिके घेतली होती. मात्र, रविवारी झुआरीवाडा परिसरातील मानसजवळील बंधारा फुटल्याने अचानक खाऱ्या पाण्याचा शिरकाव झाला आणि शेतजमिनी जलमय झाल्या. परिणामी, कापणीसाठी सज्ज असलेली पिके नष्ट झाली.

घटनेची माहिती मिळताच शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पारंपरिक पद्धतीने तातडीने दुरुस्तीचे प्रयत्न सुरू केले. मातीने भरलेल्या पिशव्यांच्या सहाय्याने त्यांनी पाणी अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र कायमस्वरूपी उपाययोजना होण्याची गरज असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. त्यांनी कृषी विभागाकडे वारंवार फुटणाऱ्या बंधारासाठी स्थायी संरक्षण उपायांची मागणी केली आहे.

शतकानुशतके जुने हे बंधारे भरतीच्या वेळी वारंवार फुटतात, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तसेच, खेकड्यांनी निर्माण केलेल्या छिद्रांमुळे भंडारा कमकुवत झाल्याचा त्यांचा दावा आहे. नारायण विठ्ठल गावडे व अन्य शेतकऱ्यांनी सांगितले की, त्यांनी मिरची, भेंडीसारखी भाजीपाला पिके घेतली होती. मात्र, बंधाऱ्याच्या भेगांमुळे कापणीसाठी तयार असलेली ही पिके पाण्याखाली गेली. नारायण गावडे म्हणाले, बाजारात जादा उत्पादन विकून चांगला नफा मिळवण्याची आम्हाला आशा होती. मात्र, पिके नष्ट झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सरकारने तातडीने शेतकऱ्यांना भरपाई द्यावी

शेतकरी आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. जर ही परिस्थिती कायम राहिली, तर शेती करणे अशक्य होईल आणि शेतीयोग्य जमीन पडीक राहण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# जुगार रॅकेटचा पर्दाफाश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** गोवा पोलिसांच्या गुन्हे शाखेने झुआरीनगर येथे एका ऑनलाईन जुगार रॅकेटचा पर्दाफाश केला आहे आणि या बेकायदेशीर कृत्याला चालना देणाऱ्या स्थानिक एजंटसह दोघांना अटक केली आहे आणि त्यांच्या ताब्यातून तीन लेनोवो टॅब्लेट, जिओ फायबर राउटर आणि १८,५०० रुपये रोख रक्कम जप्त केली आहे, ज्याची किंमत १,१२,५०० रुपये आहे.

आरोपींची ओळख पटली आहे ती म्हणजे निशांत पुजारी, ३०, प्रशांत शेट्टी, दोघेही कर्नाटकातील उडुपीचे रहिवासी आणि नावेली येथे राहणारे आहेत ७ मार्च २०२५ रोजी मुरगाव येथील झुआरीनगर येथील सपना हॉटेलजवळील एका जवळच्या जागेवर टाकलेल्या छाप्यादरम्यान त्यांना अटक करण्यात आली. दोन्ही कथित आरोपी बंद जागेत बेकायदेशीर ऑनलाइन जुगार (रोलेट) खेळत होते.

तपासादरम्यान, मडगाव येथील नावेली येथील नूरसाब सय्यदने त्यांना बेकायदेशीर जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती आणि मडगाव आणि वेर्णा परिसरात बेकायदेशीर ऑनलाइन बेटिंग नेटवर्क चालवण्यासाठी एजंट म्हणूनही काम करत असल्याचे उघड झाले.गुन्हे शाखेचे एएसआय संतोष गोवेकर यांच्याकडे या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

# मडकईकर यांची चौकशी होणार ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** गोवा पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने (एसीबी) माजी मंत्री पांडुरंग मडकईकर यांनी केलेल्या गंभीर लाचखोरीच्या आरोपांची प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत त्यांना चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मडकईकर यांनी एका मंत्र्याला फायली मंजूर करण्यासाठी १५-२० लाख रुपयांची लाच दिल्याची कथित कबुली दिली असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करता येईल की नाही, याची चाचपणी सुरू असल्याची सुत्रांची माहिती आहे

या प्रकरणात कोणत्या परिस्थितीत पैसे दिले गेले? संबंधित मंत्री कोण? हे सर्व तपासण्यास सुरुवात झाली असल्याची सुत्रांची माहिती आहे . पुरावे आरोपांना बळ देत असल्यास एफआयआर नोंदवला जाऊ शकतो. त्या दृष्टीने एसीबी लवकरच मडकईकर यांना चौकशीसाठी नोटीसही पाठवू शकते.

दरम्यान, मडकईकर यांच्या वक्तव्यावर आधारित औपचारिक तक्रार सात तक्रारदारांनी एसीबीकडे नोंदवली आहे. काशिनाथ शेट्ये, इनासियो डोमनिक परेरा, रामचंद्र मांजरेकर, जॉन फ्रान्सिस नाझरेथ, प्रेमेंद्र वेर्णेकर, मारियानो फेराव आणि कृष्णा पंडित यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गुरुवारी सादर केलेल्या या तक्रारीत भ्रष्टाचारामुळे प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आल्याचा उल्लेख आहे.

मडकईकर यांनी एका व्हिडिओत सांगितल्याप्रमाणे, सर्व मंत्री पैसे मोजण्यात व्यस्त आहेत, गोव्यात काहीच होत नाही,अशा शब्दांत त्यांनी राज्यातील प्रशासनावर टीका केली.

या व्हिडिओत त्यांनी एका मंत्र्याच्या सहाय्यकाने फायली मंजुरीसाठी १५-२० लाखांची मागणी केल्याचे सांगितले. मी माझ्या व्यवस्थापकाला त्या मंत्र्याला भेटायला पाठवले. त्याने सहाय्यकाशी संपर्क साधण्यास सांगितले. सहाय्यकाने १५-२० लाख रुपयांची मागणी केली आणि शेवटी हे पैसे देण्यात आले, असे मडकईकर यांनी स्पष्ट केले आहे . त्यांनी आणखी एक धक्कादायक खुलासा केला की, ते पक्ष सोडल्यानंतर संबंधित मंत्र्याचे नाव घेतील. या संपूर्ण प्रकरणामुळे गोव्यात राजकीय खळबळ माजली असून, प्रशासन आणि मंत्र्यांवरील संशय वाढला आहे. एसीबीच्या पुढील कारवाईकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.






# तीन खासगी बसेसचे परवाने निलंबीत

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ९ :** भाडे वसुलीत झालेल्या कथित वाद व अनियमिततेच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने मडगाव येथून धावणाऱ्या तीन खासगी बसेसचे परवाने ४५ दिवसांसाठी निलंबित केले आहेत. या संदर्भात मडगाव वाहतूक विभागाचे निरीक्षक (पीआय) संजय दळवी यांनी अधिकृत माहिती देताना सांगितले की, तीन बसेसच्या परवान्यांच्या निलंबनासंबंधी अधिकृत पत्र आम्हाला प्राप्त झाले आहे.

प्रवासी उचलण्यावरून आणि मार्गाच्या वेळापत्रकाच्या उल्लंघनावरून बस चालक व वाहक यांच्यात झालेल्या वादाचे पर्यवसान मडगावच्या आके परिसरात दिवसाढवळ्या मारामारीत झाले. या हाणामारीच्या घटनेत पोलिसांनी चालक व वाहकांसह एकूण आठ जणांना अटक केली आहे. सुमारे अर्धा तास चाललेल्या या झटापटीत दोन गटांमध्ये हातघाईची मारामारी झाली, त्यामुळे मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली.

वाहतूक विभागाच्या अहवालानुसार, एका खासगी बसने येथे अनधिकृत थांबा घेतला होता. त्याचवेळी दुसरी बस तेथे पोहोचली, ज्यामुळे दोन्ही बस कर्मचाऱ्यांमध्ये प्रवासी उचलण्याच्या मुद्यावरून वाद निर्माण झाला. हा वाद लवकरच शाब्दिक चकमकीत बदलला आणि नंतर हाणामारीपर्यंत पोहोचला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या वाहतूक पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर पीआय दळवी यांना घटनेची माहिती दिली. काही वेळातच पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले आणि आठ जणांना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी त्यांना पोलिस ठाण्यात हलवले.

या प्रकारानंतर पीआय दळवी यांनी संपूर्ण घटनाक्रमाचा अहवाल वाहतूक विभागाला सादर केला. अहवालाच्या आधारे तीन खासगी बसेसचे परवाने तातडीने ४५ दिवसांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. मडगाव रेल्वे स्थानकातून प्रवासी घेण्यासाठी बसेस अनेकदा आके येथे अनधिकृत थांबा घेतात. यामुळे वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते आणि वाद निर्माण होण्याच्या घटना घडतात. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे की, जेव्हा हा थांबा अधिकृत नाही, तेव्हा येथे बसेस थांबण्यास का परवानगी दिली जाते? या घटनेनंतर वाहतूक विभागाने या मार्गावरील बसेसच्या हालचालींवर अधिक बारीक नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.